प्रेसनोट दिनांक २१/०१/२०२३

कल्याण– डोंबिवली महानगर पालिका, कल्याण येथील सुरक्षा अधिकाऱ्यास लाच स्विकारताना लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडलेबाबत.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :– | – |
| लोक सेवकाचे नाव व कार्यालय | :– | श्री. भरत श्रावण बुळे, वय ५० वर्षे पद– सुरक्षा अधिकारी, कल्याण–डोंबिवली महानगर पालिका, कल्याण |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | १०००/– रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :– | १०००/– रूपये |
| थोडक्यात हकीकत | :– | यातील तक्रारदार हे खाजगी सुरक्षा एजन्सीमध्ये सुरक्षा रक्षक म्हणुन कार्यरत आहेत. नमुद एजन्सीस कल्याण डोंबिवली महानगर पालिकेकडुन सुरक्षा रक्षक पुरविण्याचा कंत्राट मिळालेला आहे. नमुद कंत्राटानुसार तक्रारदार हे एजन्सी तर्फे कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या अखत्यारितील एका महत्वाच्या ठिकाणी वायरलेस पाईंट येथे सदर ठिकाणी तक्रारदार व आणखी एक सुरक्षा रक्षक कार्यरत आहे. यातील लोकसेवक श्री. भरत श्रावण बुळे, सुरक्षा अधिकारी, कल्याण–डोंबिवली महानगर पालिका, कल्याण(वर्ग–३) यांनी तक्रारदार व त्यांचे सहकारी यांना एजन्सीतर्फे कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या अखत्यारितील ठिकाणावर कायम ठेवण्याकरिता दरमहा ५००/– रू प्रमाणे तक्रारदार व त्यांचे सहकारी त्यांचे एकत्रित मिळुन १०००/– रू लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार प्राप्त झाली.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दि. २०/०१/२०२३ रोजी केलेल्या पडताळणी मध्ये यातील लोकसेवक श्री. भरत बुळे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे सहकारी व त्यांचे मागील महिन्याचे १०००/–रू लाचेची मागणी करून दि. २१/०१/२०२३ रोजी स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्यावरून लाचलुचपत प्रतिबंध विभाग, ठाणे विभागाने दि. २१/०१/२०२३ रोजी सापळयाचे आयोजन करून लोकसेवक यांना तक्रारदार यांचेकडुन नमुद लाचेची रक्कम १०००/–रु. स्विकारताना सुचक नाका, चक्की नाका रोड येथे १०.०० वा. रंगेहात पकडयात आले आहे. सदर बाबत गुन्हा नोंदविण्याची कारवाई सुरू आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी – १. मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**२. मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि,भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा

---

संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसॲप्स् क्रमांक – ९९३०९९७७००

मा. सविनय सादर

( योगेश देशमुख )
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे